# एकाच दिवशी दोन बोगदे पूर्ण

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

## 'मेट्रो-3'चे नयानगर ते दादरपर्यंतचे खोदकाम पूर्ण



कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाने गुरुवारी आणखी एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला. नयानगर ते दादर दरम्यान एकाच वेळी दोन बोगद्यांची कामे एकाच दिवशी पूर्ण झाली असून, एकाच दिवशी दोन बोगदे पूर्ण होणे हे कोणत्याही भूयारी प्रकल्पात वैशिष्ट्यपूर्ण मानले जाते.

नयानगर माहीम ते दादर या पट्ट्यात बोगदा खोदण्यासाठी दोन्ही दिशेने २१ सप्टेंबर व १८ ऑक्टोबर २०१७ रोजी 'कृष्णा १' व 'कृष्णा २' या दोन टनेल बोअरिंग मशिन भूगर्भात सोडण्यात आल्या होत्या. नयानगर माहीम ते शिवसेना भवन दादर या मेट्रो स्थानकांपर्यंत बोगदा खोदण्याची जबाबदारी या दोन यंत्रांवर होती.

# मेट्रो-३ बोगद्यांतील काँक्रिटीकरणही पूर्ण



**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रोच्या नयानगर ते दादर या मार्गावर २४९० मीटरचा, तर दादर ते नयानगर या मार्गावर २४७२ मीटरचा बोगदा खोदण्याचे काम गुरुवारी पूर्ण झाले. नयानगर ते दादर दरम्यान बोगदा खणून आतमध्ये काँक्रिटच्या १७७९ रिंग आणि दादर ते नयानगर दरम्यान १७७६ रिंग बसवण्याचे कामही पूर्ण झाले.

बोगदा खणला जात असताना, ज्या भागात काम पूर्ण होते त्या भागात आतील बाजूने तात्काळ काँक्रिटचे अस्तर बसवण्यात येते. त्यामुळे पुढील बोगदा खोदला जात असताना काम पूर्ण झालेल्या भागात माती ढासळत नाही. या दोन्ही यंत्रांमार्फत दररोज १० ते १२ मीटर अंतरापर्यंत खोदकाम होत होते. इंजिनीअर व कामगार मिळून १०० जणांच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली. बेसाल्ट, टफ व ब्रेशिया असे कठीण खडक फोडत बोगदा तयार झाला आहे.

### मेट्रो निर्धारित वेळेत

'मेट्रो-३ प्रकल्पात आतापर्यंत १८ किमी म्हणजे ३५ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. या प्रकल्पासाठी विविध भागांत १७ टनेल बोअरिंग यंत्रे कार्यरत आहेत. सध्याच्या कामाची गती पाहता निर्धारित वेळेत मेट्रो मुंबईकरांच्या सेवेत आणू', असा विश्वास मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केला. यापूर्वी आंतरराष्ट्रीय विमानतळ व सीप्झ या ठिकाणी दोन बोगद्यांचे काम पूर्ण झाले आहे.